
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# 1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील वास्तव

प्रा. डॉ. जे. एफ. पाटील
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग ,
भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालय, भुसावळ.




स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजजीवन वेगाने बदलत गेले. शिक्षणाचा प्रसार ग्रामीण भागापर्यंत पोहचू लागल्याने, तेथील समाजमनात आत्मभान जागे झाले. तेथील तरूण स्वतःचा शोध घेऊ लागला. साहित्यात स्वतःचे स्थान आणि वास्तव जीवन त्याला दिसले नाही. आपले व आपल्या समाजाचे सभोवतालचे वास्तव जीवन यावे यासाठी तो लिहीता झाला. परिणामी 1960 नंतर मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी साहित्य असे नवनवीन साहित्य प्रवाह उदयास आले. आधुनिक मराठी साहित्य अधिक समृध्द व विकसित करण्याचे काम या नवप्रवाहांनी केले, आजही करीत आहेत.

मराठी कादंबरीसाठी पोषक वातावरण महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्यांचा असुड' आणि इतर वैचारिक लेखनातून तयार झाले. ग्रामीण जीवनाशी संबंधीत कृष्णराव भालेकर यांची 'बळोबा पाटील', रा. वि. टिकेकर ऊर्फ धर्नुधारी यांची 'पिराजी पाटील' या दोन ग्रामीण कादंबऱ्यांनी सुरूवात केली. परंतु त्यातील ग्रामीण जीवनाचे चित्रण जाणीवपूर्वक आलेले नाही. त्यामागील लेखनाच्या भूमिका वेगळया आहेत. 1920 नंतर मात्र म. गांधीजींच्या 'खेडयाकडे चला' हया हाकेतून व ग्रामीण कुतुहलापोटी ग्रामीण जीवनदर्शन मराठी साहित्यातून घडू लागले. ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे इत्यादी कादंबरीकार उदयाला आले.

1960 नंतर ग्रामीण कादंबरी लेखनाचे संदर्भ बदलले. कारण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेषतः स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार खेडयापाडयापर्यंत झाला. ग्रामीण भागातील माणूस शिकून लिहू लागला शिवाय मराठवाडा मुक्तिसंग्राम, 1972 चा दुष्काळ, स्त्रियांचे प्रश्न, आरक्षण नामांतराचा लढा, प्रसारमाध्यमांचे वाढते महत्त्व, नागरीकरण, औद्योगिकरण, हरितक्रांती अशा अनेक घटनांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे ग्रामीण समाजमनावर प्रभाव पडून त्याचेच प्रतिबिंब ग्रामीण कादंबरीतून उमटू लागले. ग्रामीण समाजवास्तव समोर आले. ग्रामीण कादंबरीतून उमटू लागले. ग्रामीण कादंबरी अधिक जोमदारपणे लिहिली जाऊ लागली. भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला', हमीद दलवाई 'इंधन', उध्दव शेळके 'धग', आनंद यादव 'गोतावळा', रा. रं. बोराडे 'पाचोळा', ना. धों. महानोर 'गांधारी', मनोहर तल्हार यांची 'माणूस' या महत्त्वाच्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण वास्तवाचे भान तर आलेच पण कादंबरी लेखनातून कलात्मक अभिव्यक्तीचे नवे आदर्शही समोर ठेवलेत.

### 1980 नंतरची ग्रामीण कादंबरी आणि वास्तव :–

1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीत आशादायक चित्रण दिसून येते. बदलत्या ग्रामीण जीवनातील विविध विषयांचे वास्तव चित्रण समर्थपणे मांडणारी कादंबरी लिहिली जाऊ लागली. 1980 नंतर सामाजिक आणि वाड्‌मयीन क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होऊ लागल्यामुळे समकालीन वास्तवाला ग्रामीण कादंबरी समर्थपणे सामोरी गेली आहे. बदलते राजकारण, बदलते शैक्षणिक व आर्थिक धोरणं, बदलते ग्रामीण जीवन, आशय आणि अभिव्यक्तीमधील बदल, जागतिक घडामोडींचा प्रभाव यामुळे ग्रामीण समाजजीवनात जे परिवर्तन झाले त्याचेच पडसाद ग्रामीण कादंबऱ्यांमध्ये उमटू लागले.

1980 नंतरही पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतील लेखकांनी ग्रामीण कादंबरीमध्ये आणखी चांगली भर घातली आहे. व्यंकटेश माडगुळकर – 'सत्तांतर', 'करूणाष्टके', रा. रं. बोराडे – 'चारापाणी' (1989), आनंद यादव – 'नटरंग', बंकट पाटील – 'मंधान' (1980), उत्तम बंडू तुपे – 'झुलवा' (1986), गणेश आवटे – 'गणगोत' (1984), आनंद पाटील – 'कागूद आणि सावली' (1986), बाबाराव मुसळे – 'हाल्या हाल्या दुध दे' (1985), राजन गवस – 'चौडकं' (1985), 'भंडारभोग' (1986), पुरूषोत्तम बोरकर – 'मेड इन इंडिया' (1987), अशोक व्हटकर – 'बगाड' (1984), नागनाथ कोत्तापल्ले – 'उलट चालिला प्रवाहो' (1985), 'गांधारीचे डोळे' (1985), वासुदेव मुलाटे – 'विषवृक्षाच्या मुळया' (1989), विश्वास पाटील 'आंबी' (1980), सुभाष सावरकर 'आहुती' (1981) ही नावे उल्लेखनीय आहेत.

1980 नंतरची कादंबरी समकालीन वास्तवाचा शोध घेत नव्या जीवन जाणिवांचे चित्रण करते. ग्रामीण जीवनातील सर्व प्रकारची अभावग्रस्तता, शेतकऱ्यांचे दारिद्रय, कष्ट, त्यांचे अज्ञान, त्यांचे शोषण, दुष्काळामुळे होणारी होरपळ, त्यांचा कर्जबाजारीपणा, त्यांचे शेती आणि जनावरांवरील प्रेम, शेतमालाला न मिळणारा भाव, घराघरापर्यंत पोहचलेले राजकारण व गटातटातील शत्रूत्व यासारखे शेतकऱ्यांच्या जीवनातील प्रश्न, समस्या तसेच शेतमजूर, ऊसतोड कामगार, देवदासी प्रथा, दलितांचे शोषण, सरकारी यंत्रणेतील दिरंगाई, सहकार क्षेत्र तेथील भ्रष्टाचार, सुशिक्षित तरूणांची मानसिकता या सर्वांची वास्तवपणे नोंद घेते. बदलत्या काळानुसार जे नव्याने प्रश्न निर्माण झाले त्या प्रश्नांचाही मागोवा तिने घेतला आहे. विशेषतः खेडयातील स्त्रियांचे दुःख, कष्ट, शोषण, अपमानित वागणूक, पारंपरिक रीतिरीवाजामुळे तिला होणारा जाच, कुटुंबातून मिळणारी निर्दयी वागणूक याचेही वास्तव चित्रण हया कादंबरींमध्ये आले आहे. प्रस्तुत ग्रामीण कादंबरींच्या लेखनाविषयी रेखा वडिखाये लिहितात, ''. ......1980 च्या आसपास मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये आमुलाग्र बदल सुरू झाले. आतापर्यंत जे अनुभवविश्व चित्रण कक्षेत येत नव्हते असे अनुभव प्रकट व्हायला लागले. चित्रणक्षेत्राचा पट अधिकच विस्तृत होऊ लागला. त्यातून ग्रामीण जीवनाची समग्रता प्रकट होण्याची शक्यता निर्माण झाली.''[1] तर या बदलत्या साहित्य प्रवाहाबद्दल द. ता. भोसले लिहितात, ''1980 नंतरच्या काळात या साहित्यप्रवाहात एक लक्षणीय बदल घडलेला दिसतो. तो म्हणजे तळागाळातला तरूण मोठ्या आत्मविश्वासाने लिहू लागला. या तरूणाची नाळ सद्यस्थितीशी आणि आजच्या ग्रामीण जनजीवनाशी अजूनही पक्की बांधलेली आहे. तो स्वतःही खेडयात जगतो. स्वतःही शेती करतो. त्यामुळे अवतीभोवतीचे बदलते वास्तव त्याच्या चिंतनाचा व लेखनाचा विषय झाले नाही तरच नवल! हा तरूण लेखक वर्ग नागर वाचकांच्या मनोरंजनाचा विचार न करता किंवा अभिरूचीला शरण न जाता अतिशय गांभीर्याने लेखन करतो आहे.''[2]

1990 नंतरची ग्रामीण, कादंबरी अधिक वास्तव होतांना जाणवते. या कालखंडात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाला आलेले महत्त्व, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणाचा उदय, सामाजिक प्रसार माध्यमांमुळे माहिती तंत्रज्ञानाच्या जाण्यामुळे जग एक झाले, माणसामाणसातील अंतर कमी झाले. परंतु माणूस माणसापासून दुरावला या बद्दलची चिंता, खंत व्यक्त करतांना वासुदेव मुलाटे लिहितात, ''.......या स्पर्धेत प्रत्येक जण एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आहेत. या काळात कधी नव्हे एवढी धर्मांधता वाढली, दंगली वाढल्या, बेरोजगारी वाढली, जातीय हिंसाचार वाढला, मानवी मूल्यांची घोर विटंबना आणि समाजाचे तुटलेपण वाढले. सवंग मनोरंजन बोथट जाणिवा, बदललेली जीवनशैली, बुध्दीजीवी व कष्टकरी श्रमिकांमधील तुटक संवाद ही या काळाची वैशिष्टये. खरे तर माणसामाणसातील संवादच संपला आहे. या संवादासाठी वैचारिक पुल उभारणेच जणू थांबले आहे. विशेष आर्थिक क्षेत्र, खाजगीकरण, उदारीकरणाच्या धोरणामुळे धरणग्रस्त, विस्थापितांचे नवेच प्रश्न निर्माण होत आहेत आणि भविष्यात आणखी भयावह होतील.''[3] हा जागतिकीकरणाचा प्रभाव 'झाडाझडती', 'ताम्रपट', 'धिंगाना', 'कळप', 'तहान', 'इथं होतं एक गाव', 'एसईझेड' आदी कादंबरींच्या लेखनावर पडलेला अनुभवास येतो.

या काळानंतर ग्रामीण साहित्य (विशेषतः ग्रामीण कादंबरी) संख्येने विपुल लिहिली गेली. ती आशय व अभिव्यक्तीनेही वेगळे आहे. त्यामागे खेडयातल्या बदलत्या समाजजीवनाचा संदर्भ आहे. या बदलत्या ग्रामीण वास्तवातील वेगवेगळया विषयांवर कादंबरी लेखन झाले आहे.

राजकारणातील बदलत्या वातावरणामुळे, निवडणूकांमुळे महाराष्ट्र ढवळून निघाला. भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांचा ऱ्हास, शिक्षण ते नोकरी यातील जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली. डोनेशन, विनाअनुदानित शाळा यांचे पेव फुटले, सुशिक्षित तरूण पदव्या घेऊन बेरोजगार झाले. चंगळवाद, नैराश्य, व्यसनाधिनता, आत्महत्या अशा भयावह परिस्थितीचे वास्तव चित्रण सदानंद देशमुख यांची 'बारोमास', 'तहान', रंगनाथ पठारे 'ताम्रपट', नागनाथ कोत्तापल्ले 'उलट चालीला प्रवाहो' (1985), 'गांधारीचे डोळे', राजन गवस 'तणकट', शेषराव मोहिते 'धुळपेरणी', राजन खान 'धिंगाणा', 'हयात आणि मजार' इत्यादी कादंबऱ्यांमध्ये आलेले आहे.

धार्मिक रूढी, अंधश्रध्दा, तेढ, जाती–जातीमधील संघर्ष, शोषण मोठया प्रमाणावर झाले होत आहे. याचे ग्रामीण वास्तव राजन गवस यांच्या 'चौंडक', 'भंडार भोग', उत्तम बंडू तुपे 'झुलवा', अशोक व्हटकर 'बगाड' इत्यादी कादंबऱ्यांमधून चित्रित झाले आहे. देवदासी प्रथेतील भयावह चित्रण वास्तवपणे 'चौंडक' कादंबरीतून मांडले आहे. जाती संघर्षात दलित–सवर्ण, दलित–बहुजन, दलित–दलित यांच्यातील संघर्षाचे चित्रण 'तणकट' कादंबरीत तसेच अशोक व्हटकर यांची 'मेलेलं पाणी', नामदेव कांबळे 'राघववेळ' या कादंबऱ्यांमधून जाती जातीतील अंतर्विरोध प्रकट करणे, दलितांचे नेतृत्व चळवळी, राजकारण, समाजकारण यातील अपयश असे विविध विषय मांडले गेले आहेत.

ग्रामीण स्त्रियांच्या संघर्षाचे चित्रण, रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट', राजन गवस 'तणकट', प्रतिमा इंगोले 'बुढाई', 'पार्टटाईम', बाबाराव मुसळे 'वारूळ', 'पाटीलकी', कृष्णा खोत 'गावठाणं', 'झिम पोरी झिम', 'अंगार कूस' आदी कादंबऱ्यांतून व्यक्त झालेले आहे. ग्रामीण स्त्रीचे दुःख, शोषण, स्त्रीजाणिवा, तिचे जगणे या विषयांवर वास्तव अनुभव मांडले आहेत.

बदलत्या ग्रामजीवनातील जीवनमूल्यांच्या पडझडीचे 'शहर' आणि 'खेडे' यांची तुलना 'इंडिया' आणि 'भारत' या दोन समाज–वास्तवामधील भेद मार्मिकपणे टिपण्याचे कार्य पुरूषोत्तम बोरकर यांनी 'मेड इन इंडिया' मध्ये केले आहे. तसेच, आनंद पाटील 'कागूद आणि सावली', बाबाराव मुसळे 'हाल्या हाल्या दुध दे' आदी कादंबऱ्यांमधून ग्रामीण कृषीक्षेत्रातील अडचणी, समस्या, खेडयांचे शोषण वास्तवपणे मांडले आहे.

सहकार क्षेत्रातील स्वाहाःकार, ग्रामीण समाजजीवनातील परिवर्तन, ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा कोंडमारा, आर्थिक पिळवणूक, ऊसतोड कामगारांचे शोषण इत्यादी विषयांचे वास्तव वर्णन वासुदेव मुलाटे यांच्या – 'विषवृक्षाच्या मुळया', अशोक कुलकर्णी –'चेअरमन', बा. ग. केसकर –'कुणाच्या खांद्यावर', मोहन पाटील – 'साखरपेरा', सरदार जाधव – 'कोयता' या कादंबऱ्यांमधून आलेले आहे.

शेतकरी जीवनाचे समकालीन वास्तव अनेक ग्रामीण कादंबऱ्यांचे समर्थपणे आलेले आहे. सदानंद देशमुख यांची 'बारोमास' या कादंबरीत ग्रामीण कृषीव्यवस्थेच्या पडझडीचे, बदलाचे, विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे अशा ज्वलंत समस्यांचे प्रखर चित्रण केले आहे. भिमराव वाघचौरे यांच्या 'रानखळगी' मध्ये मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या दुःखाचे, दारिद्रयाचे कर्जबाजारीपणाचे चित्रण येते. अशोक कोळी यांची 'पाडा' ही कादंबरी खानदेशातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या मांडते. बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुध दे' ही कादंबरी विदर्भातील सामान्य शेतकऱ्याची शोकांतिका मांडते. याशिवाय राजन गवस – 'ब–बळीचा', आनंद विंगकर 'अवकाळी पावसादरम्यानची गोष्ट', रवींद्र पांढरे –'पोटमारा', नवनाथ गोरे – 'फेसाटी' या अलिकडच्या कादंबऱ्यांमधून शेती व शेतीक्षेत्राशी संबंधी जनजीवनाच्या हलाखीचे, समस्यांचे चित्रण वास्तवपणे चित्रित केलेले अनुभवास येते.

कोरडा दुष्काळ, नापिकी, ओला दुष्काळ, पर्यावरणातील असमतोलामुळे येणारी नैसर्गिक आपत्तीमुळे माणसाप्रमाणेच गुराढोरांचे मोठया प्रमाणावर हाल होतात त्यांना चारापाण्याचा अभाव जाणवतो. शासन स्तरावरून तुटपुंजी व्यवस्था करून कुठे–कुठे चाराछावण्या उभारून आपल्या कर्तव्यपूर्तीचा आव आणला जातो परंतु त्यातील खऱ्या समस्यांचे वास्तव दर्शन, रा. रं. बोराडे यांची 'चारापाणी', विश्वास पाटील –'पांगिरा', सदानंद देशमुख 'तहान', रवींद्र शोभणे 'पांढर' आदी कादंबरी लेखनातून समर्थपणे घडविले आहे. शेती क्षेत्रात पाण्याचा अमर्याद होणारा वापर त्यामुळे जाणवणारी पाणीटंचाई, जमिनीचा खालावत चाललेला दर्जा, ग्रामीण भागातील पाणीटंचाई हे प्रखर वास्तव या कादंबऱ्यांचे विषय झाले आहेत.

शासन स्तरावर विकासाच्या नावाखाली विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) निर्माण केले जाते. शेतकऱ्यांना परवानगीशिवाय त्यांच्या जमिनी घेतल्या जातात. यातील गैरव्यवहार दडपशाहीचे ज्वलंत चित्रण शंकर सखाराम यांच्या 'सेझ' या कादंबरीतून मांडले आहे.

शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांचे प्रश्न, आर्थिक ओढाताण, बेरोजगारीचेही चित्रण अनेक कादंबरीकारांनी चित्रित केले आहे. खेडोपाडी झालेल्या शिक्षणाच्या प्रसारामुळे शेतकऱ्यांची मुलं शिकली. परिणामी शेतीवरील त्यांचे लक्ष कमी झाले. नैसर्गिक तसेच मानवनिर्मित समस्यांमुळे शेती व्यवसाय बेभरवशाचा झाला आहे. त्यातच आधुनिक तंत्रज्ञान, दळणवळण, सोशल मिडिया यामुळे शहरी आकर्षण वाढले. शहरी जीवनशैलीमुळे त्यांना भुरळ घातली. कमी श्रमात जास्त पैसा मिळविण्याची प्रवृत्ती वाढली, एकूणच शहरी चंगळवादाने ग्रामीण तरूण—तरूणींना घेरल्यामुळे त्यांची मानसिकता बदलली. या बदलत्या मानसिकतेचे, नैराश्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'बारोमास' मधील एकनाथ, मधु, सुरेश साठे हया व्यक्तिरेखा तसेच तहानमधील — बबन शेवाळे, धुळपेरणीमधील 'श्रीराम', सेझमधील 'चंदू', पोटमारा मधील प्रकाश पानघरे ही ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार मुलं, त्यांची आर्थिक ओढाताण, पिळवणूक, नैराश्य, व्यसनाधिनता, याचे वास्तव रेखाटन या कादंबऱ्यांमधून येते.

एकूणच 1980 नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीतून शेती व शेतकऱ्यांच्या जीवघेण्या समस्यांचे चित्रण अनेक कादंबरीकारांनी केलेले आहे. ग्रामीण जीवनाचा गाभा असलेला 'शेती' व 'शेतकरी' हाच त्यांच्या कादंबरीचा केंद्रबिंदू राहीला आहे. या कृषीक्षेत्रावर जागतिकीकरणाचा, आधुनिक तांत्रिक शेतीचा, सोशल मिडिया नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्ती, शासकीय, आर्थिक धोरणांचा जो बरा—वाईट परिणाम झाला त्याचा समर्थपणे वेध घेत, त्याचे वास्तव जीवनपट ती मांडते. हया 1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीबद्दल गणेश देशमुख लिहितात, "......... नागरशरणतेच्या ग्रहणातून सुटलेली 1980 नंतरची कादंबरी ग्रामीण जीवनातील अनेक पैलूंना आता कुठे स्पर्श करू पाहते आहे. नव्या लेखकांनी 'सवंगते' च्या आहारी न जाता ग्रामीण समाज व साहित्याचे असणाऱ्या संबंधाचे आकलन करून अधिक अंतर्मुख होऊन 'निष्ठे' ने लेखन केले तर उद्याची मराठी कादंबरी केवळ 'ग्रामीण कादंबरी' च होऊ शकते, एवढी अनुभव व आशय क्षमता ग्रामीण जीवनानुभवात व संस्कृती चित्रणात आहे, असे प्रामाणिकपणे वाटते."[4] आणि त्यांच्या या मताशी मराठी वाचक, अभ्यासक सहमत होतील, अशी आशा वाटते.

........................

## संदर्भ ग्रंथ :—

1) रेखा वडिखाये, 'महायुध्दोत्तर मराठी कादंबरी', लाखे प्रकाशन, नागपूर, 2012, पृ. 515
2) द. ता. भोसले, '1980 नंतरचे मराठी साहित्य : प्रवाह आणि वळणे' (लेख) 'आमची श्रीवाणी', ऑक्टो 2004 ते जाने. 2005, पृ. 9
3) वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,2005, पृ. 124—125
4) गणेश देशमुख, '1980 नंतरची मराठी कादंबरी' (लेख), '1980 नंतरचे मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा', संपा. जयद्रथ जाधव, भरत देशमुख, अरूणा प्रकाशन, लातूर, 2012, पृ. 111